महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १५/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयपीएस-२०२४/प्र.क्र.१४६/पोल-१,
दि.१४ ऑक्टोबर २०२४

**विषय :-** "सहायक पोलीस अधीक्षक" संवर्गाची दहा अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत
(भा.पो.से-७६ वी सरळ सेवाप्रविष्ट तुकडी)

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयपीएस-२०२४/प्र.क्र.१४६/पोल-१, दि.१४ ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१४११२२१०१८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस अधिक्षक, चंद्रपूर/रत्नागिरी/जालना/अमरावती ग्रामीण/ छत्रपती संभाजीनगर ग्रामीण/ नाशिक ग्रामीण / अहमदनगर/ परभणी/ सोलापूर ग्रामीण/ लातूर
कार्यासन अधिकारी, का.क्र. १

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

“सहायक पोलीस अधीक्षक” संवर्गाची दहा अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत-
(भा.पो.से.- ७६ वी सरळ सेवाप्रविष्ट तुकडी)

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय, क्रमांकः आयपीएस-२०२४/प्र.क्र.१४६/पोल १**

२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई. पिन- ४०० ०३२.
दिनांक: १४.१०.२०२४.

**संदर्भ** : अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्र. अपोमसं/प्रशि-२/परि.भापोसे/७६ आर आर/२०२४/१३९८, दिनांक ०१.१०.२०२४.

**प्रस्तावना.**

भारतीय पोलीस सेवेच्या ७६ व्या सरळ सेवाप्रविष्ट तुकडीतील महाराष्ट्र संवर्गातील दहा परिवीक्षाधीन अधिका-यांना, महाराष्ट्र राज्यात जिल्हा प्रात्यक्षिक प्रशिक्षण [DPT] देण्याकरिता, ते महाराष्ट्र राज्यात परिवीक्षाधीन म्हणून रुजू झाल्याच्या दिनांकापासून ते फेज-II चा प्रशिक्षण कालावधी पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच दिनांक २८.१०.२०२४ ते दिनांक २५.०७.२०२५ या कालावधीसाठी, “सहायक पोलीस अधीक्षक” म्हणून नियुक्ती देण्याच्या प्रयोजनासाठी “सहायक पोलीस अधीक्षक” संवर्गाची दहा अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, यांनी सादर केला आहे. त्यास अनुलक्षून, शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय.**

भारतीय पोलीस सेवेच्या ७६ व्या सरळ सेवाप्रविष्ट तुकडीतील, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद महाराष्ट्र संवर्गातील परिवीक्षाधीन अधिका-यांकरिता, स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनांवर, दिनांक २८.१०.२०२४ ते दिनांक २५.०७.२०२५ या कालावधीसाठी, प्रत्येकी एक याप्रमाणे “सहायक पोलीस अधीक्षक” यांची एकूण दहा अधिसंख्य पदे, याद्वारे, निर्माण करण्यात येत आहेत,-

| अ.क्र. (१) | परिवीक्षाधीन भा.पो.से. अधिकारी यांचे नाव (श्री./श्रीम.) (२) | नियुक्तीचा जिल्हा (३) |
|---|---|---|
| १. | अनिकेत ज्ञानेश्वर हिरडे | चंद्रपूर |
| २. | निखिल बसवराज पाटील | रत्नागिरी |
| ३. | सिद्धार्थ बरवाल | जालना |
| ४. | प्रशांत सुरेश डगळे | अमरावती ग्रामीण |
| ५. | मयंक माधव | छत्रपती संभाजीनगर ग्रामीण |
| ६. | अपराजिता अग्निहोत्री | नाशिक ग्रामीण |
| ७. | रॉबिन बन्सल | अहमदनगर |

| | | |
|---|---|---|
| ८. | ऋषिकेश हणमंत शिंदे | परभणी |
| ९. | अंजना क्रिष्णा व्ही. एस. | सोलापूर ग्रामीण |
| १०. | सागर यशवंत खर्डे | लातूर |

२. उक्त परिवीक्षाधीन भा.पो.से. अधिका-यांचे वेतन व भत्ते यांवरील खर्च हा वरील तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनांवर आहरित करण्यात येईल. त्यासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, ००, १०९, जिल्हा पोलीस (००) (००)(०१) जिल्हा पोलीस बल (२०५५०१६८) (दत्तमत) (अनिवार्य), ०१-वेतन, या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१२/प्र.क्र.६६/१२/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ११.०७.२०१२, अन्वये प्रशासनिक विभाग या नात्याने गृह विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करुन, सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४१०१४११२२१०१८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

VENKATESH MADHAV BHAT

Digitally signed by VENKATESH MADHAV BHAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E277C9088A4CB8B53E535A4642A6800B908C5DBDB3A63175760874EBA717AE1, cn=VENKATESH MADHAV BHAT
Date: 2024.10.14 17:18:00 +05'30'

**( व्यंकटेश भट )**
**शासनाचे सह सचिव.**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर/रत्नागिरी/जालना/अमरावती ग्रामीण/छत्रपती संभाजीनगर ग्रामीण /नाशिक ग्रामीण / अहमदनगर/परभणी/सोलापूर ग्रामीण /लातूर.
३) संबंधित परिवीक्षाधीन भा.पो.से. अधिकारी [अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत].
४) वित्त विभाग (व्यय -७/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
५) निवड फाईल, पोल १.